**दृष्टीकोन**

"ती" -
जगाचं सोड,
स्वतःलाच वेड लागलंय वाटण्याएवढं
प्रेम केलं मी तुझ्यावर..
खरं तर एकदा तू भेटल्यावर
दुसरा पर्यायच नसल्यासारखं
प्रेम केलं मी तुझ्यावर..
आयुष्यातल्या वाटा
वेगळ्याच असणार माहीत असताना
आयुष्यभर पुरेल
एवढं प्रेम केलं मी तुझ्यावर...
वेगळ्या झालेल्या वाटा
कधीही परत मिळणार नाहीत
याची खबरदारी मात्र तू घेतलीस -
खरंच प्रेम केलंस माझ्यावर?
माझ्यावर प्रेम आहे म्हणता म्हणता
आयुष्यातून पुसून टाकलंस मला
माझी घालमेल, माझा त्रास
सगळंच मनाआड कारण्याएवढं -
आणि म्हणतोस, प्रेम केलंस माझ्यावर !
खरं काय ते तुलाच ठाऊक...
पण,
माझं वेडं प्रेम
अजूनही
तुझ्या त्या
कधी काळी
डबडबलेल्या
लाल तांबूस डोळ्यांत
सांडू की नको सांडू म्हणत

अडकून पडलंय...

"तो" -
जगाचं सोड
स्वतःच्याच मनाविरुध्द
तुला विसरून टाकल्याचं भासवलं,
एवढं प्रेम केलं मी तुझ्यावर...
आपल्या वाटा वेगळ्या म्हंटल्यावर
निदान तुला तरी गवसावी
एखादी कोवळी छाया
माझ्या आठवणीतून मुक्त
असं मोकळं आकाश
म्हणून लांबच राहिलो
तुझ्यापासून, प्रयत्नपूर्वक
एवढं प्रेम केलं मी तुझ्यावर..
तुझी गुदमर, तुझी घालमेल
भोगली माझ्याही काळजाने
पण फुंकर मारणारे
हक्काचे कोणी मिळावे तुला
याची वाट पहात राहिलो
एवढं प्रेम केलं मी तुझ्यावर...
मी सुध्दा शोधला मार्ग
समाजाच्या वहिवाटीचा
बुडवले त्यात स्वतःला
आणि तोडला
तुझ्याशी असलेला
प्रत्येक धागा
जाणून बुजून.
त्रागा केला असशील तू
दूषणेही दिली असशील मला
हे जाणूनही हसत राहिलो,
एवढं प्रेम केलं मी तुझ्यावर..

आयुष्यात एकमेकांशिवाय जगण्याच्या
सवयी साठीच केवळ
हा सारा अट्टाहास !
नाहीतर,
तुझं वेडं प्रेम
असं थांबवून ठेवलं नसतं
आयुष्यभर
माझ्या पापण्यांच्या कडेशी
कोरडं आयुष्य जगताना..
आता डोळे मिटतील
ते त्या पाण्यासकटच !

© **प्रीती देशपांडे**